## कलम ४ (१) (ब) (बारा) अ व ब

## मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथील कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदान वाटपाचा तपशील व लाभार्थींचा तपशील

## कामगार शाखा

## मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथील कामगार शाखेतील कामगार कल्याण कार्यक्रमांतर्गत लाभार्थींची विस्तृत माहिती.

**योजना : (१) शिष्यवृत्ती योजना -** प्रत्येक अधिकारी व कर्मचारी (रोजंदार व अर्धवेळ कर्मचाऱ्यांसह) यांच्या वेतनातून दरमहा रु.५/- प्रमाणे दि.१.१.२००९ पासून कपात करण्यात येते. तसेच महामंडळाचे अंशदान म्हणून दरवर्षी रु.६० लाखाचा निधी सदर योजनेमध्ये जमा केला जातो. ही योजना रोजंदार व अर्धवेळ कामगारांना सुध्दा अनुज्ञेय आहे.

| अ.क्र | लाभार्थीचे नाव व पत्ता | अनुदान /लाभ याची रक्कम स्वरूप | निवड पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| १. | दरवर्षी कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्यांची गुणानुक्रमे येणारी एकूण ३५० पात्र विद्यार्थ्यांची नावे. | ११वी व १२वी विज्ञान, वाणिज्य व कला अभ्यासक्रमासाठी रु.२००/- दरमहा प्रत्येकी.<br><br>प्रथम,व्दितीय व तृतीय विज्ञान, वाणिज्य व कला व तत्सम पदवी अभ्यासक्रमासाठी(तीन वर्षे) रु.३५०/-दरमहा प्रत्येकी<br>पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे व अभ्यासक्रमानुसार रु.३५०/- दरमहा.<br><br>अभियांत्रिकी व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त साडेचार वर्षे व अभ्यासक्रमा- नुसार रु.७५०/- दरमहा. | इयत्ता १०वी व तत्सम परिक्षा ६० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या मुलां/मुलींना गुणानुक्रमे प्रत्येक घटकातून १० शिष्यवृत्त्या देण्यात येतात.<br>अर्जदारास तीन पेक्षा अधिक मुले असल्यास तसेच दि.१.५.२००१ पुर्वी ज्यांना दोन मुले आहेत त्यांना १.५.२००१ नंतर तिसरे अपत्य झाल्यास अशा कर्मचाऱ्यांची मुले शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र नाहीत. दि.१.५.२००१ नंतर ज्या कर्मचाऱ्यांना फक्त दोन मुले असतील अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांची मुले शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरतील. |

**योजना : (२) बक्षिस योजना -**

प्रत्येक अधिकारी व कर्मचारी (रोजंदार व अर्धवेळ कर्मचाऱ्यांसह) यांच्या वेतनातून दरमहा रु.५/- प्रमाणे दि.१.१.२००९ पासून कपात करण्यात येते. तसेच महामंडळाचे अंशदान म्हणून दरवर्षी रु.६० लाखाचा निधी सदर योजनेमध्ये जमा केला जातो. ही योजना रोजंदार व अर्धवेळ कामगारांना सुध्दा अनुज्ञेय आहे.

| अनु.क्र. | लाभार्थीचे नाव व पत्ता | अनुदान/लाभ याची रक्कम/ स्वरुप | निवड पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| १. | दरवर्षी कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्यांची गुणानुक्रमे येणारी एकूण १०० पात्र विद्यार्थ्यांची नावे. | इयत्ता १०वी व तत्सम परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे १०० बक्षिसे दिली जातात.<br>१ ते २५ विद्यार्थी पर्यंत रु.२०००/-<br>२६ ते ५० विद्यार्थी पर्यंत रु.१५००/-<br>५१ ते ७५ विद्यार्थी पर्यंत रु.१०००/-<br>७६ ते १०० विद्यार्थी पर्यंत रु.५००/- | ३५० पाल्यांना शिष्यववृत्ती मंजूर केल्यानंतर राहिलेल्या अर्जामधून गुणानुक्रमे प्रथम १०० पाल्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतात.<br>अर्जदारास तीन पेक्षा अधिक मुले असल्यास तसेच दि.१.५.२००१ पुर्वी ज्यांना दोन मुले आहेत त्यांना १.५.२००१ नंतर तिसरे अपत्य झाल्यास अशा कर्मचाऱ्यांची मुले बक्षिस मिळण्यास पात्र नाहीत. दि.१.५.२००१ नंतर ज्या कर्मचाऱ्यांना फक्त दोन मुले असतील अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांची मुले बक्षिस मिळण्यास पात्र ठरतील. |

**योजना : (१) म.रा.मा.प.महामंडळ कर्मचारी कुटुंब कल्याण योजने अंतर्गत दि.१.४.२००४ पासून अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रु.४०/- व महामंडळ दरवर्षी रु.१ कोटी ५० लाख इतकी रक्कम अंशदान म्हणून देते. ही योजना रा.प. महामंडळातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना (अर्धवेळ व रोजंदार कर्मचा-यांसह) लागू आहे.**

| अनु. क्र. | लाभार्थीचे नाव व पत्ता | अनुदान (आर्थिक सहाय्य) रक्कम/ स्वरुप | निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | रा.प.सेवेत असताना अधिकारी व कर्मचारी मृत्यू पावल्यास त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी वारसाच्या नावे तातडीचे सहाय्य. | रु.५०००/- | | |
| | मृत्यू फंड.<br>रा.प.सेवेत असताना अधिकारी व कर्मचारी मृत्यू पावल्यास त्यांच्या वारसाच्या नावे. | रु.१ लाख (धनादेश) | मृत्यू पावलेल्या रा.प कर्मचारी/ अधिकारी यांच्या नामनिर्देशित व्यक्तीच्या नावे महामंडळाच्या मुदत ठेव योजनेत पाच वर्ष मुदतीसाठी ठेवण्यात येते. | |
| | दंगे, पूर, भूकंप इ. नैसर्गिक आपत्ती या कारणांमुळे अधिकारी व कर्मचारी यांचे नुकसान झाल्यास त्यांची नावे. | रु.२०००/- | संबंधित आपदग्रस्त रा.प कर्मचारी/ अधिकारी यांना अदा करण्यात येते. तसेच अधिक नुकसान झाल्यास रु.२०००/-<br>पेक्षा जास्त आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रकरणपरत्वे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार आहेत. | |
| | सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचारी यांना सेवानिवृत्त प्रसंगी भेट. | रु.२०००/- | सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त रा.प कर्मचारी/ अधिकारी | |
| २ | हिंदुह्यसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजना | रु.१,००,०००/- | अधिकारी / कर्मचारी यांच्या मुलीस २१व्या वर्षी एकरकमी रु.१ लाखचे आर्थिक सहाय्य या योजने अंतर्गत देण्यात येते. सन २०१७-२०१८ या अर्थिक वर्षात सुमारे ९१५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. | |